# व्हर्च्युअल शिक्षक अन् ऑनलाईन शिक्षण

» पान १ वरून

मनावर बिंबवला जातो. आवाजाच्या माध्यमातून विद्यार्थी त्या विषयाशी एकरूप होतो. त्यांची स्मरणशक्तीही यामुळे चांगली होते. त्यामुळे व्हर्च्युअल बोर्ड हा एक पर्यायी शिक्षकच आता वर्गामध्ये उभा आहे.

## लोकप्रिय शैक्षणिक ॲप

एडएक्स, खान अकादमी, दुओलिंगो, स्मरण करून द्या, फोटोमाथ, सोलोलर्न, क्विझलेट, कहूत.

# व्हर्च्युअल शिक्षक अन् ऑनलाईन शिक्षण

## नव्या तंत्रज्ञानाने अध्यापन बनले प्रभावी : शिक्षणाची वाढली उंची

**ओंकार धर्माधिकारी :**
सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ४ : कोरोनाच्या कालावधीत ऑनलाईन शिक्षण ही विद्यार्थ्यांची गरज बनली. भविष्यात ऑनलाईन शिक्षणाचा वारू आणखी धावणार आहे. व्हर्च्युअल क्लासरूम, 'रोबो टीचर', विविध प्रकारचे ॲप, ज्ञानवर्धक संकेतस्थळे यामुळे विद्यार्थी स्वयंअध्ययन करतात; मात्र शिक्षणातील शिक्षकाचे महत्त्व आजही तितकेच आहे.

विद्यार्थ्यांच्या जीवनाला आकार देणाऱ्या शिक्षकांना पर्याय नसला तरी विकसित होणारे शिक्षणिक तंत्रज्ञान शिक्षणाची उंची वाढवणारे आहे. अशा काही मोजक्या गोष्टींचा घेतलेला आढावा.

**शिक्षणामध्ये शिक्षकाला पर्याय नाही; मात्र शिक्षकांना अध्यापनासाठी साहाय्यभूत ठरणारे तंत्र विकसित झाले आहे. या तंत्राची मदत घेऊन विद्यार्थी स्वयंअध्ययन करू शकतात. तसेच शिक्षक या तंत्राच्या साहाय्याने अधिक प्रभावी अध्यापन करू शकतात. त्यामुळे तंत्रज्ञानाच्या शतकात या नव्या तंत्राला महत्त्व आहे.**
– **प्रा.डॉ.आर.के.कामत** (संगणकशास्त्र विभागप्रमुख, शिवाजी विद्यापीठ)

### ॲप

भाषा शिकण्यासाठी विविध प्रकारचे ॲप उपलब्ध आहेत. या ॲपचे वैशिष्ट्य म्हणजे मराठी भाषेतून आपण अन्य भाषा शिकू शकतो. यावर ऐकण्याची सुविधा असते. परदेशातून शिकण्यासाठी येणारे विद्यार्थी किंवा परप्रांतात शिक्षणासाठी जाणारे विद्यार्थी या ॲपच्या माध्यमातून तेथील भाषा आत्मसात करतात.

### रोबो झाला शिक्षक

बंगळूरमधील एका शाळेत विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी आणि त्यांच्याशी संवाद साधण्यासाठी ह्युमनॉइड रोबोट वापरला जातो. हा रोबोट रोज सुमारे ३०० विद्यार्थ्यांना पाच विषयांचे धडे देतो. विद्यार्थ्यांच्या विविध विषयातील प्रश्नांना उत्तर देतो. 'एआय-सक्षम हे रोबोट्स जीवशास्त्र, रसायनशास्त्र, भूगोल, इतिहास आणि भौतिकशास्त्र विषयांचे धडे शिकवतात.

### व्हर्च्युअल बोर्ड

बहुतांश शाळांमध्ये आता व्हर्च्युअल बोर्ड आले आहेत. जे शिक्षकांना अध्यापनामध्ये साहाय्यभूत ठरतात. एखाद्या विषयाच्या संबंधित व्हिडिओ, ॲनिमेशन, ग्राफ त्यावर दाखवता येतात. थ्रीडी तंत्रज्ञानाचा वापर करूनही अनेक व्हिडिओ यावर दाखवता येतात. यामुळे विद्यार्थ्यांना त्या विषयाचे आकलन चांगले होते. प्रत्यक्ष चित्र, व्हिडिओ त्यांच्या

पान २ वर »

### थ्रीडी प्रिंटर



- थ्रीडी प्रिंटरच्या माध्यमातून सहज शक्य झाल्या गोष्टी
- इतिहास विद्यार्थी तपासणीसाठी ऐतिहासिक कलाकृती प्रिंट (मुद्रित) करू शकतात.
- ग्राफिक डिझाइनचे विद्यार्थी त्यांच्या कलाकृतीची ३ डी आवृत्ती प्रिंट करू शकतात.
- भूगोलचे विद्यार्थी भूगोल, लोकसंख्याशास्त्र किंवा लोकसंख्या नकाशे मुद्रित करू शकतात.
- केमिस्ट्रीचे विद्यार्थी रेणूंचे थ्रीडी मॉडेल्स प्रिंट करू शकतात.
- जीवशास्त्र विद्यार्थी पेशी, व्हायरस, अवयव आणि इतर जैविक कलाकृती छापू शकतात.

# अंतिम वर्षाची परीक्षा केवळ एका तासाची!

## पेपर ५० गुणांचा; निकाल ऑक्टोबरपर्यंत

- परीक्षा ऑनलाईन, शक्य नसेल तेथे ऑफलाईन
- एमक्यूआर, ओपन बुक, असाईनमेंट बेस हे पर्याय

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना परीक्षा घरी बसूनच देता याव्यात, यासाठी त्यांना विविध प्रकारचे तीन पर्याय देण्यात येणार आहेत. हे पर्याय राज्यातील प्रत्येक विद्यापीठाने आपल्या निवडीनुसार स्वीकारावेत. तसेच अंतिम वर्षाची परीक्षा केवळ एका तासाची, परीक्षा पेपर ५० गुणांचा असेल, अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी शुक्रवारी दिली. या परीक्षांचे वेळापत्रक ७ सप्टेंबर रोजी जाहीर करण्याचा आमचा प्रयत्न असेल, असेही त्यांनी सांगितले.

अंतिम वर्षाच्या परीक्षांसंदर्भात शुक्रवारी पुन्हा कुलगुरू आणि इतर तज्ज्ञांच्या सोबत एक बैठक घेतली. राज्यातील विद्यार्थ्यांच्या परीक्षा या ओपन बुक, एमसीक्यू, असाईनमेंट बेस अशा तीन पर्यायांच्या माध्यमातून घेतल्या जातील आणि हे पर्याय निवडीचे स्वातंत्र्य विद्यापीठांना असेल, असेही सामंत म्हणाले.

कुलगुरू समितीकडून सादर केलेला अहवाल राज्यातील प्रत्येक विद्यापीठांना पाठविला **पान २ वर ▸**

# परीक्षेसाठी सर्व पर्याय खुले ठेवावेत!

(पान १ वरून) दरम्यान परीक्षा आयोजित करून विद्यापीठांनी निकाल लावावा, असे निर्देश देण्यात आले आहेत. परदेशी उच्च शिक्षणासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मागच्या सेमिस्टरपुरते प्रोव्हिजनल सर्टिफिकेट दिले जाईल, असेही सामंत यांनी स्पष्ट केले. परीक्षा पद्धती, वेळापत्रक, कालावधी यांचे नियोजन करून सोमवारी ७ सप्टेंबर २०२० रोजी १२ वाजता अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

# एक तासात आता ५० गुणांची परीक्षा

## शिक्षणमंत्र्यांचे सूतोवाच; अहवाल सादर

**सकाळ वृत्तसेवा**

### » अंतिम वर्ष परीक्षा

मुंबई, ता. ४ : अंतिम वर्षाची परीक्षा ही तीन तासांऐवजी एक तासाची व १०० गुणांऐवजी ५० गुणांची घेण्यात येणार असल्याचे सूतोवाच शुक्रवारी (ता. ४) उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी केले. मात्र, या परीक्षा घेताना तंत्रज्ञानावर भर देत लेखी परीक्षांसाठी विद्यापीठाला एमसीक्यू, असाइन्मेंट किंवा ओपन बुकचे पर्याय खुले केले आहेत. तसेच, प्रात्यक्षिक परीक्षा स्काइपसारख्या मीटिंग ॲप किंवा टेलिफोनिक पद्धतीने घेण्याच्या सूचनाही उदय सामंत यांनी केल्या आहेत. परीक्षापद्धती, वेळापत्रक व अभ्यासक्रम, याबाबत तातडीने निर्णय घेऊन ७ सप्टेंबर पर्यंत सरकारकडे अहवाल सादर करावा, अशाही सूचना त्यांनी विद्यापीठाला दिल्या आहेत.

अंतिम वर्षाच्या परीक्षेसंदर्भात राज्य सरकारने कुलगुरूंची समिती स्थापन केली होती. या समितीने शुक्रवारी राज्य सरकारला सादर केलेला अहवाल उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी जाहीर केला. एकूण ११ सूचना अहवालामध्ये समितीकडून मांडण्यात आल्या होत्या. यावर विद्यापीठाची शिक्षण समिती आणि परीक्षा मंडळाची तातडीने बैठक घेऊन परीक्षा कशा पद्धतीने घेता येतील, यावर चर्चा करून त्याची माहिती सात सप्टेंबरपर्यंत सरकारला देत परीक्षेचे वेळापत्रक व अभ्यासक्रम तातडीने जाहीर करावी, अशी सूचना सरकारकडून देण्यात आली.

विद्यापीठांनी स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन परीक्षा घेण्यात अडचण असल्यास त्याची माहिती तातडीने सरकारला कळवावी, जेणेकरून परीक्षा पुढे ढकलण्यासंदर्भात यूजीसीला कळवून मुदतवाढ घेण्यात येईल, असेही सामंत यांनी यावेळी सांगितले.

### समितीच्या सूचना

- विद्यार्थी घरूनच परीक्षा देतील, असे प्रयत्न करा
- गुणवत्ता कायम राखण्यासाठी कमी कालावधीत परीक्षा घ्या
- ऑनलाइन, ऑनलाइन व ऑफलाइन किंवा पेन व पेपर, यांचा वापर करून घरातूनच परीक्षा घ्यावी
- दिव्यांग विद्यार्थ्यांना सोयीसुविधा द्याव्यात
- काही कारणांमुळे परीक्षा देता न आल्यास अशांसाठी पुन्हा परीक्षा घ्यावी

# अंतिम वर्षाची परीक्षा केवळ एका तासाची!

(पान १ वरून) आहे. या अहवालावर संबंधित विद्यापीठाने तातडीने आपल्या परीक्षेच्या संदर्भात निर्णय घेऊन त्यासाठीची माहिती कळवावी. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानंतर कोणत्याही स्थितीत या परीक्षा पार पाडायच्या आहेत. राज्यपालांनी विद्यार्थ्यांना घरी बसून परीक्षा देण्यासंदर्भात सकारात्मक भूमिका घेतली आहे. त्यामुळे आता सोमवारी अथवा मंगळवारी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली आपत्ती व्यवस्थापनाची बैठक घेण्यात येईल. त्यानंतर यूजीसीकडे परीक्षेच्या काही तारखा आणि त्याची मुदत वाढ करून द्यावी, अशी मागणी करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

राज्यातील सर्वच विद्यापीठांमध्ये १५ ते ३० सप्टेंबर या कालावधीमध्ये प्रात्यक्षिक परीक्षा घेतल्या जातील आणि या सर्व प्रात्यक्षिक परीक्षा तोंडी पद्धतीने घेतल्या जातील, याविषयी आमचा निर्णय झाला आहे. कोणत्याही विद्यार्थ्यांना लॅबमध्ये जाऊन ही प्रात्यक्षिक परीक्षा देण्याची गरज नाही, असेही सामंत यांनी स्पष्ट केले.

राज्यातील विद्यापीठांमध्ये तब्बल सात लाख ९२ हजार ३८५ विद्यार्थी अंतिम वर्षाची परीक्षा देणार आहेत. या विद्यार्थ्यांना अत्यंत सोप्या पद्धतीने परीक्षा कशी देता येईल, यावर आमचा भर असल्याची माहितीही त्यांनी यावेळी दिली.

## कुलगुरुंची समिती : १ ते ३१ ऑक्टोबरदरम्यान परीक्षा घ्या

# परीक्षेसाठी सर्व पर्याय खुले ठेवावेत!

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राज्यातील अकृषि विद्यापीठांच्या अंतिम सत्रातील परीक्षेसाठी ऑनलाईन, ऑफलाईन आणि संमिश्र असे सर्व पर्याय खुले ठेवण्याची शिफारस कुलगुरुंच्या समितीने राज्य सरकारकडे केली. कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव आणि प्रत्येक जिल्ह्यातील भौगोलिक परिस्थिती लक्षात घेऊन परीक्षा पद्धती ठरविण्याचा निर्णय विद्यापीठ प्राधिकरणांवर सोपविण्यात आला आहे.

अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेण्यासंदर्भात नियोजन करण्यासाठी मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. सुहास पेडणेकर यांच्या अध्यक्षतेखालील दहा सदस्यीय समिती नियुक्त केली आहे. या समितीने केलेल्या ११ शिफारशींचा अहवाल उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी जाहीर केला. अंतिम वर्षाच्या परीक्षांच्या निर्णयासाठी १५ ते ३० सप्टेंबरदरम्यान प्रात्यक्षिक परीक्षा आणि १ ते ३१ ऑक्टोबर (पान ८ वर)

## महत्त्वाच्या शिफारशी

- विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतरांच्या आरोग्याच्या सुरक्षेला प्राधान्य देऊन परीक्षांचे नियोजन करावे. विद्यार्थी घरातून परीक्षा देतील, यासाठी प्रयत्न करावेत.
- कमीत कमी कालावधीच्या परीक्षांचे आयोजन करता येईल. वस्तुनिष्ठ प्रश्न, ओएमआर पद्धती, ओपन बुक किंवा असाइनमेंट पद्धतींचा अवलंब करता येईल.
- दिव्यांगांना आवश्यक सुविधा विद्यापीठांनी उपलब्ध करुन द्याव्या. पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांच्या प्रकल्प अहवालांसाठी यूजीसीच्या मार्गदर्शक सूचनांचा अवलंब करता येईल.
- विशेष बाब म्हणून, विद्यार्थी एखाद्या विषयाला बसू शकला नाही, तर त्याला पुन्हा संधी द्यावी.
- प्रात्यक्षिक परीक्षांसाठी स्काईप, मीटिंग ॲपचा वा टेलिफोनिक पद्धत वापरावी.